# जनसंपर्क अधिकारी

## पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार

### पोलीस आयुक्त यांचे कार्यालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे फोन नं ०२२-२९४५१००१
Email ID – pro.cp.mb-v@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्र. ५२-२२** **दिनांक १५/०२/२०२२**

## अवैधरित्या वैदयकिय व्यवसाय करणा-या डॉक्टरवर गुन्हे शाखेची कारवाई.

मिरा-भाईंदर व वसई विरार महानगर पालिकेच्या कार्यक्षेत्रामध्ये काही व्यक्ती अवैधरित्या वैदयकिय (डॉक्टर) व्यवसाय करुन जनतेची दिशाभुल करुन फसवणुक करित असलेबाबत पोलीसांना प्राप्त लेखी व तोंडी तक्रारीच्या अनुषंगाने पोलीस उप आयुक्त, (गुन्हे) मि.भा.व.वि. पोलीस आयुक्तालय यांनी अवैधरित्या वैदयकिय व्यवसाय करणा-या डॉक्टरांबाबत गोपनीयरित्या माहिती मिळवून कारवाई करणे बाबत वेळोवेळी मार्गदर्शन करुन सुचना दिलेल्या होत्या.

पोलीस उप आयुक्त, (गुन्हे) यांनी दिलेल्या सुचनांनुसार मिरा-भाईंदर महानगर पालिका व वसई-विरार महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील अनुक्रमे १० व १४ संशयीत डॉक्टरांची यादी तयार करण्यात आली. सदर संशयीत डॉक्टरांचे क्लिनिकला प्रत्यक्ष भेट देवून व शहानिशा करुन प्रभावी कारवाई करण्यासाठी गुन्हे शाखेतील अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर, नालासोपारा कक्ष-१, कक्ष-२, कक्ष-३, मध्यवर्ती कक्ष व भरोसा सेल येथील अधिकारी व अंमलदार यांची वेगवेगळी २४ पोलीस पथके तयार करुन दिनांक १४/०२/२०२२ रोजी सायंकाळी १९.०० वा. सुमारास एकाच वेळी २४ क्लिनिकमध्ये पंचासह छापा टाकुन प्राथमिक विचारपूस करुन लागलीच मिरा-भाईंदर व वसई-विरार महानगर पालिकेच्या आरोग्य विभागाच्या वैदयकिय अधिका-यांना पाचारण करुन क्लिनिकमध्ये हजर असलेल्या डॉक्टरांचे वैदयकिय अर्हता प्रमाणपत्र, महाराष्ट्र वैदयकिय परिषद यांचेकडील नोंदणी प्रमाणपत्र, मिरा-भाईंदर, वसई-विरार महानगर पालिकेचे नोंदणी प्रमाणपत्र, बायोमेडीकल वेस्ट प्रमाणपत्र आणि इतर कागदपत्रांची पडताळणी करुन खात्री केली.

सदर कारवाईमध्ये एकूण २४ क्लिनीक पैकी ०४ क्लिनिकच्या सबंधीत ३ डॉक्टरांविरुध्द अनुक्रमे काशिमीरा पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि.क्र. ९४/२०२२ महाराष्ट्र वैदयक अधिनियम १९६१ चे कलम ६६, आचोळे पोलीस ठाणे गुन्हा रजि.क्र.९८/२०२२ भादविसं.क. ४२०, ४१९ सह महाराष्ट्र मेडीकल प्रॅक्टीस अधिनियम कलम ३३, ३६ व वालीव पोलीस ठाणे गुन्हा रजि.क्र. १७७/२०२२ भादविसं.क. ४२०, ४१९ सह महाराष्ट्र मेडीकल प्रॅक्टीस अधिनियम कलम ३३, ३६ प्रमाणे गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. तसेच ०८ क्लिनिकमधील डॉक्टरांनी सादर केलेली कागदपत्र प्रथमदर्शनी संशयास्पद आढळुन आल्याने पंचनाम्या-अंतर्गत तपासकामी ताब्यात घेण्यात आलेले असून सदर कागदपत्राबाबत वैदयकिय अधिकारी यांचा पडताळणी अहवाल प्राप्त होताच कारवाई करण्यात येणार आहे. तसेच ०८ क्लिनिकमध्ये सादर केलेले कागदपत्र पडताळणीअंती योग्य असल्याचे आढळुन आले व ०४ क्लिनिक बंद आढळुन आले.

सदरची कारवाई डॉ. श्री. महेश पाटील, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त, (गुन्हे) मि.भा.व.वि. पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि. श्री. संपतराव पाटील, पोनि. प्रमोद बडाख, पोनि. शाहूराज रणवरे, पोनि. चौधरी, सपोनि. टोकले, सपोनि. जगताप, सपोनि. कांबळे, सपोनि. बेन्द्रे, सपोनि. तेजश्री शिंदे, सपोनि. दत्ता सरक, पोउनि. सोनवणे, पोउपनि. सुर्वे, पोउपनि. खाडे आणि पथकातील पोलीस अंमलदार यांनी केली आहे.